Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.नं.८३२-ए, फा.प्लॉ.नं. १७८,
१७९, बालचित्रवाणी शेजारी,
आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

जा.क्र.रा.मं./परीक्षा-६/१०७८

दिनांक ०४.०३.२०२३

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२) मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक,पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई-४०००३०.
४) मा. संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई-२०
५) मा. संचालक,आकाशवाणी केंद्र
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक/रत्नागिरी
६) मा. सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७) मा. संपादक, सर्व वृत्तवाहिनी व वृत्तपत्रे

विषय- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रु-मार्च २०२३ "इंग्रजी" विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील त्रुटीबाबत...

महोदय,

फेब्रु-मार्च २०२३ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा "इंग्रजी" विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील त्रुटीबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपली विश्वासू,

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ०४.

क्रमांक पुविमं/शाखा ब/1444
पुणे-411005
दिनांक-04/03/2023

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
जिल्हा-पुणे/अहमदनगर/सोलापूर

**संदर्भ - राज्य मंडळाचे जा.क्र.रा.मं./परिक्षा-६/१०७८ दिनांक ०४/०३/२०२३ रोजीचे प्रकटन**

उपरोक्त राज्य मंडळाच्या प्रकटनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी तसेच सदर माहिती आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व इंग्रजी विषयाचे शिक्षक/परीक्षक/नियामक तसेच संबंधित घटक यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

क्रमांक पुविमं/शाखा-ब/ १४४४
पुणे ४११००५
दिनांक ०४/०३/२०२३

(अनुराधा ओक)
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११००५

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# प्र क ट न

विषय— फेब्रुवारी—मार्च २०२३ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेतील "इंग्रजी" विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील त्रुटीबाबत...

---

फेब्रुवारी—मार्च २०२३ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा दि. २१ फेब्रुवारी २०२३ पासून आयोजित करण्यात आलेली आहे.

दि. २१ फेब्रुवारी, २०२३ रोजी "इंग्रजी" विषयाची परीक्षा झाली आहे. प्रचलित पध्दतीप्रमाणे इंग्रजी विषयाची संयुक्त सभा विषय तज्ज्ञ व सर्व विभागीय मंडळाचे प्रमुख नियामक यांच्या समवेत दि. ०३.०३.२०२३ रोजी आयोजित करण्यात आली. सदर इंग्रजी प्रश्नपत्रिकेमध्ये त्रुटी/चुका आढळून आल्या असल्याचे इंग्रजी विषयाच्या संयुक्त सभेच्या अहवालावरून निदर्शनास येते. सदर अहवालानुसार त्रुटी असलेल्या प्रश्नांचे गुण विद्यार्थ्यांना पुढील परिस्थितीमध्ये देण्यात येतील.

१. Poetry Section-2 / Poetry / Section-2 असा केवळ उत्तरपत्रिकेमध्ये उल्लेख केला असल्यास,

२. Poetry Section-2 मधील अन्य कोणतेही प्रश्न विद्यार्थ्यांनी सोडविण्याचा प्रयत्न केला असल्यास,

३. त्रुटी असलेल्या प्रश्नांचे क्रमांक (A-3, A-4, A-5) असे केवळ उत्तरपत्रिकेत नमूद केले असल्यास,

उपरोक्त तीन पैकी कोणत्याही एका प्रकारचे लेखन उत्तरपत्रिकेत विद्यार्थ्यांनी केले असल्यास, विद्यार्थ्यास प्रत्येक प्रश्नाचे ०२ याप्रमाणे एकूण ०६ (सहा) गुण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

दिनांक : ०४.०३.२०२३

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.